
गोष्टी
गमतीजमतीच्या
श्याम कुरळे
परी प्रकाशन







**गोष्टी गमतीजमतीच्या**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-





# अनुक्रमणिका


१. नामी उपाय ..... ५

२. आळशी माणसाची गोष्ट ..... ७

३. जलाशय आणि नाला ..... ९

४. फक्त एक दिवस थांब ! ..... १२

५. पैशाचं झाड ..... १५

६. देवत्व ..... १८

७. पैजेतून सुटका ..... २०

८. खादी कपड्यांवरील विश्वास ..... २२

९. शांतिब्रह्म कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे ..... २३

१०. भागीदार ..... २५

११. बहुमताचा न्याय ..... २७

१२. शिक्षक आणि चारित्र्य ..... ३१

१३. माणुसकीचा गहिवर ..... ३२

१४. निस्वार्थी विश्वस्ताचा आदर्श ..... ३४

१५. भुताचे पाय ..... ३५

१६. तानीबाईचा त्याग ..... ३८

१७. श्रीमंत मणाचा बैरागी ..... ४०

१८. अमिरी व गरिबी ..... ४०

१९. जशास तसे ..... ४२

२०. खरी दौलत ..... ४५

२१. न संपणारी देणगी ..... ४७

२२. खरी किंमत ..... ४९

२३. कष्टाची भाजी–भाकरी ..... ५०

२४. पसायदानाचा प्रभाव ..... ५४

२५. पाणी श्रेष्ठ की प्राण? ..... ५६

२६. सुखी जीवनाचा मार्ग ..... ५८

२७. ज्योतिषाला अद्दल घडली ..... ६१

२८. पायाचा पाषाण आणि सोन्याचा कळस ..... ६३

२९. झुंज ..... ६४

३०. लाख मोलाच्या गोष्टी ..... ६८

३१. ऐतखाऊंना खातो काळ ........................................ ७७
३२. मोठे कोण ? ........................................ ८१
३३. शेतकरी राजा झाला ........................................ ८३
३४. पाचाचे पंचवीस ........................................ ८६
३५. असंगाशी संग ........................................ ८९
३६. माकडाचं घर ........................................ ९१
३७. वारस ........................................ ९२
३८. एका अपयशाची कथा ........................................ ९५
३९. चतुर चंपा ........................................ ९७
४०. करायला गेले एक ........................................ १००
४१. पाटलाचा मान ........................................ १०४
४२. चतुरसेनाचे चातुर्य ........................................ १०९
४३. बहादूरसिंगची तेजस्वी कथा ........................................ ११३
४४. भोपळ्याचं गुपित ........................................ ११६
४५. कथा मानव प्राण्याची ........................................ १२०
४६. साहस ........................................ १२२
४७. धूर्त कोल्हा आणि लबाड लांडगा ........................................ १२९
४८. परोपकाराचे फळ ........................................ १३२
४९. होळी ........................................ १३६
५०. मूठभर मातीचे दान ........................................ १३८
५१. सवयीचे गुलाम ........................................ १४०
५२. धोंडिराम संस्कृत शिकतो त्याची गोष्ट ........................................ १४२
५३. चार तासांचा प्रवास ........................................ १४६
५४. भोजन आणि प्रवचन ........................................ १४७
५५. अन्न तारी, अन्न मारी ........................................ १४९
५६. आधी केले, मग सांगितले ........................................ १५१
५७. धंदा आणि ध्येयवाद ........................................ १५२
५८. साक्षात देवदर्शन ........................................ १५४
५९. पुस्तकवेडा लिंकन ........................................ १५६
६०. इच्छाशक्तीचा प्रभाव ........................................ १५७
६१. अर्धवट ज्ञानाची सजा ........................................ १५९

# नामी उपाय

धनपाल शेठजी नावाचा एक धनिक माणूस होता. शेतीवाडी, कारखानदारी, व्यापार आणि सावकारी असा त्याच्या दौलतीचा चौफेर व्याप होता. तो सर्व व्याप सांभाळण्यासाठी त्यानं एक दिवाणजी नेमलेला होता. तो दिवाणजी अतिशय चतुर होता. कोणत्या वेळी काय केलं असता फायदा होईल याबाबत तो शेठजींना अगदी अचूक मार्गदर्शन करीत असे. त्यामुळे शेठजींना प्रत्येक व्यवहारात फायदाच फायदा होत असे. शेठजी दिवाणजीच्या या चातुर्यावर नेहमी खूश असत. दिवाणजीलाही खूश ठेवण्यासाठी अधून मधून त्याच्या पगारातही वाढ करीत असत.

तो दिवाणजी जसा चतुर होता तसाच लबाडही होता. नेहमी खोटं बोलण्याची अत्यंत वाईट सवय होती त्याला. हळूहळू ही गोष्ट शेठजींच्या ध्यानी आली आणि ते खूप हवालदिल झाले. ज्याच्याकडे चातुर्य आणि लबाडीही आहे, तो दिवाणजी एक दिवस नक्कीच आपणास मोठा आर्थिक फटका दिल्यावाचून राहणार नाही, ही चिंता शेठजींना सतत सतावू लागली. बरं, त्याला कामावरून काढून टाकलं तर शेठजींना त्याच्या चातुर्याचा लाभ होणार नव्हता. तसंच कामावर ठेवलं तर एक दिवस लबाडी करून शेठजींना फसविण्याचा धोका वाटत होता. अशा परिस्थितीत काय करावं तेच त्यांना कळत नव्हतं.

एके दिवशी दिवाणजीची खोटं बोलण्याची सवय नष्ट कशी करता येईल याबाबत शेठजी विचार करीत असतानाच त्यांच्याकडे एक साधू आला. शेठजी विचारात पडल्याचे पाहून साधूने विचारले, ''शेठजी, खूप धनदौलत मिळवलीत तुम्ही. आता आणखी विचार कसला करता?''

साधूच्या प्रश्नावर शेठजी म्हणाले, ''महाराज, देवाच्या दयेनं आणि आपल्या आशीर्वादानं सध्या माझं ठीकच चाललंय. पण ज्या दिवाणजीच्या चातुर्याच्या बळावर आज मी मोठ्या दौलतीचा धनी झालो आहे, त्या दिवाणजीला सतत खोटं बोलायची वाईट सवय आहे. त्या सवयीमुळं एक दिवस तो मला मोठा आर्थिक फटका देऊन अगदी जमीनदोस्त करील अशी भीती मला सतत भेडसावते आहे. तेव्हा त्या दिवाणजीची खोटं बोलण्याची सवय नष्ट करण्याचा काही उपाय आहे का?''

शेठजीच्या प्रश्नावर शांतपणे विचार करून साधू महाराज म्हणाले, ''शेठजी, जगात प्रत्येक समस्येवर उपाय आहे. माणसाला वाईट सवयी चटकन लागतात, पण त्या नष्ट करून चांगल्या सवयी लागण्यासाठी दीर्घकाळ प्रयत्नपूर्वक उपाय करावे लागतात इतकेच.''

साधू महाराजांच्या स्पष्टीकरणावर उतावीळपणे शेठजी म्हणाले, ''मग आमच्या दिवाणजीची सतत खोटं बोलण्याची सवय नष्ट करण्यासाठी एखादा नामी उपाय सुचवा ना?''

''ठीक आहे. बोलव तुझ्या त्या चतुर पण लबाड दिवाणजीला.''

साधू महाराजांनी आज्ञा देताच शेठजीने दिवाणजीला बोलावणे पाठवले. तो येताच साधू महाराज त्याला उद्देशून म्हणाले, ''तुझ्याकडे असणारा एखादा लोटा आणि त्यात मावतील इतके रस्त्यावरचे खडे वेचून शक्य तितक्या त्वरेने इकडे घेऊन ये.''

साधू महाराजांची आज्ञा ऐकताच दिवाणजी तातडीने आपल्या खोलीत गेले आणि छोट्यात छोटा लोटा शोधला. तो घेऊन ते रस्त्यावर गेले. लोट्यात मावतील इतके मोठ्यात मोठे दगड-गोटे गोळा करून एका पाटीत भरले आणि ते सर्व घेऊन साधू महाराजांकडे आले.

त्याच्याकडे करुण मुद्रेने पाहात साधूमहाराज उद्गारले, ''अरेरे! तुझा वेळ आणि कष्ट वाचवण्यासाठी छोट्यात छोटा लोटा आणि मोठ्यात मोठे दगड-गोटे घेऊन आलास, पण त्यामुळे तू लवकरच मरणार आहेस!''

साधू महाराजांच्या तोंडचे उद्गार ऐकताच मरणाच्या भीतीने त्यांचे पाय धरीत दिवाणजी म्हणाले, ''महाराज, मला इतक्यातच मरायचं नाही. खूप खूप जगायचं आहे!''



''किती जगायचं ते तुझ्या हातातच आहे, पण त्यासाठी तुला खोटं बोलायची सवय सोडावी लागेल. खरं बोलायची सवय प्रयत्नपूर्वक लावून घ्यावी लागेल.''

''त्यासाठी मी काय करू ते कृपा करून सांगा ना?''

दिवाणजीच्या प्रश्नावर गंभीरपणे साधू महाराज म्हणाले, ''तू ज्या ज्या वेळी खोटं बोलशील त्या त्या वेळी या पाटीतील एकेक खडा या लोट्यात टाकत जा. ज्या वेळी लोटा पूर्ण भरेल ती तुझ्या मृत्यूची वेळ असेल!''

साधू महाराज दिवाणजीच्या मृत्यूचं गणित मांडून गेले. त्या दिवसापासून ज्या ज्या वेळी खोटं बोलण्याचा प्रसंग येई, त्या त्या वेळी दिवाणजींना साधू महाराजांच्या त्या गणिताची आठवण होई आणि मृत्यूच्या भीतीने खोटं बोलायचं टाळून ते खरंच बोलण्याचा प्रयत्न करीत असत. अशा तऱ्हेने त्यांची खोटं बोलण्याची सवय नाहीशी झाली. ते मेले त्या दिवसापर्यंत एकही खडा त्या लोट्यात पडला नाही आणि 'सत्यप्रिय दिवाणजी' असा त्यांचा सर्वत्र लौकिक झाला.

✦

# आळशी माणसाची गोष्ट

अजब नगरीत गजबराज नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याचा स्वभाव अतिशय लहरी आणि विक्षिप्त होता. एकदा त्याला आळशी माणसांची स्पर्धा घ्यायची लहर आली. लगेच त्याने सर्वात अधिक आळशी माणसाला सोन्याच्या पाचशे मोहरांचं बक्षीस जाहीर केलं. त्या बक्षिसाच्या आशेने आळशी माणसांच्या नातलगांनी आपापल्या घरातील आळशी लोकांना राजासमोर हजर केले. अशा रीतीने राजासमोर हजारो आळशी लोकांची रीघच लागली. त्यातून सर्वात अधिक आळशी माणसाची निवड करण्यासाठी सर्व आळशी माणसांची कसोटी घ्यायची, असं राजानं ठरवलं.

राजाकडे फार वर्षांपूर्वीचा एक प्रचंड महाल होता. त्याला चार मजले होते. त्यातील पहिल्या मजल्यात राजाने सर्व आळशी माणसांना कोंडून पहिल्या मजल्याला आग लावली. आगीच्या ज्वाला भडकू लागताच चौथ्या मजल्यावरील बहुसंख्य आळशी माणसे मृत्यूच्या भीतीने 'वाचवाऽ वाचवाऽऽ' म्हणत जोरजोराने ओरडू लागली. राजाने आपल्या सेवकांना त्या आळशी माणसांना खाली उतरविण्याची आज्ञा दिली. सेवकांनी त्यांना शिड्या व दोरांच्या सहाय्याने खाली उतरविले. शेवटी चौथ्या मजल्यावरील चारच आळशी लोक उरले.


इतक्यात दुसरा मजलाही पेट घेऊ लागला. ते दृश्य पाहून त्या चार आळशी माणसांपैकी एकाचा धीर सुटला आणि तोही जोरजोराने ओरडून 'वाचवाऽ वाचवाऽऽ' अशी विनवणी करू लागला. मग राजाने त्यालाही खाली उतरविण्याची व्यवस्था केली.

आता चौथ्या मजल्यावर तीनच आळशी माणसे उरली होती. थोड्याच वेळात तिसरा मजलाही धडाधड पेटू लागला. त्या आगीच्या भयंकर ज्वाला पाहून त्या तिघांपैकी आणखी एकाला आपला मृत्यू जवळ येत असल्याची जाणीव झाली. तोही भीतीने 'वाचवाऽ वाचवाऽऽ' अशी आरडाओरड करू लागला. त्यालाही राजाने खाली उतरविण्याची व्यवस्था केली.

शेवटी चौथ्या मजल्यात दोनच आळशी माणसे उरली होती. त्या दौघांपैकी अधिक आळशी कोण ते ठरणार होते. थोड्याच वेळात तो चौथा मजलाही आगीने घेरला. आगीच्या ज्वाला त्या दोन आळशी माणसांच्या रोखाने धावू लागल्या. क्षणार्धात आपण जळून भस्मसात होणार या जाणिवेने त्या दोन आळशी माणसांपैकी एकजण 'मेलोऽ मेलोऽऽ वाचवाऽ वाचवाऽऽ' असे सर्व शक्तीनिशी ओरडून खालच्या लोकांना विनवू लागला. त्याची विनवणी ऐकताच राजाने त्यालाही खाली उतरविण्याची व्यवस्था केली.

आता त्या चौथ्या मजल्यावर एक आळशी माणूस उरला होता. आगीच्या ज्वाला त्याला जाळून भस्मसात करण्यासाठी प्रत्येक क्षणाला त्याच्या जवळ सरकत होत्या. तरीही तो पठ्ठ्या एकाच जागी ढिम्म बसून होता. त्याला उतरवून घेतले नाही तर तो आगीच्या ज्वालातून वाचणे शक्यच नाही, अशी राजाची पक्की खात्री झाली. मग राजाने त्याला सुरक्षितपणे उतरवून घेण्याची सेवकांना आज्ञा दिली. सेवकांनी शिकस्तीचे प्रयत्न करून कसेबसे त्याला खाली उतरविले. तो खाली उतरताच राजाने त्याचे अभिनंदन केले आणि सर्वात अधिक आळशी म्हणून सन्मानपूर्वक पाचशे मोहरांचे बक्षीस स्वीकारण्यासाठी दुसऱ्या दिवशी आपल्या दरबारात हजर राहण्याविषयी पुन: पुन्हा बजावले.

दुसऱ्या दिवशी राजाने मोठा दरबार भरविला आणि तो त्या आळशी माणसाची वाट पाहू लागला. त्याने खूप वेळ वाट पाहूनही तो आळशी माणूस पाचशे मोहरांचे मौल्यवान बक्षीस स्वीकारण्यासाठी राजाच्या दरबारात फिरकला नाही. शेवटी राजाने त्याला बोलावून आणण्यासाठी आपल्या सेवकांना पाठविले. सेवक जेव्हा त्या आळशी माणसाकडे आले तेव्हा तो अगदी निवांतपणे डाराडूर झोपलेला होता. सेवकांनी त्याला बराच वेळ



हलवून जाग आणली आणि पाचशे मोहरांचे बक्षीस स्वीकारण्यासाठी राजाच्या दरबारात चलण्याची विनंती केली. त्यावर अंगाला आळोखे पिळोखे देत त्रासिकपणे तो म्हणाला,

''आलो असतो हो – पण मला फार म्हणजे फाऽरच कंटाळा आलाय बुवा! बक्षीस स्वीकारायला मी राजाच्या दरबारातच कशाला यायला हवं? त्याऐवजी इकडेच बक्षीस पाठवायला राजाला सांगा ना?''

त्याचं बोलणं ऐकून नाइलाजानेच सेवक दरबारात परत गेले. त्यांनी त्या आळशी माणसाचं मत राजाला ऐकवलं. तेव्हा राजाच्या तोंडून उद्गार निघाले –

''वा! आळशांचा खराखुरा सम्राटा शोभतो तो! आता त्याचं बक्षीस त्याच्या घरीच पाठवून द्या!''

राजाच्या तोंडचे उद्गार ऐकून सर्व दरबारीजन राजाच्या तोंडाकडे आ वासून पाहातच राहिले.

✦

# जलाशय आणि नाला !

एक होते जलाशय. विस्ताराने मोठे आणि बरेच खोल होते. पट्टीच्या पोहणाऱ्यालासुद्धा त्याचा अंत लागत नसे. अनेक छोटे–मोठे नाले त्याला येऊन मिळत असत. ते सदैव पाण्याने तुडुंब भरलेले असे. कित्येक वाटसरू येता–जाता त्या जलाशयातील पाणी पीत असत. तहानलेले पशू–पक्षीही त्या जलाशयातील पाणी पिऊन तृप्त होत असत.

अगदी कडक उन्हाळ्याच्या दिवसात नद्या–नाले आटून जात. पाण्याविना प्राणिमात्रांचे फार हाल होत. अशा वेळी सर्वजण पाण्यासाठी त्या जलाशयाकडेच धाव घेत. त्यातील पाणी पिऊन संतुष्ट होत. जाताना समाधानाने त्या जलाशयाला धन्यवाद देत. त्याचबरोबर रस्त्यातल्या आटलेल्या नाल्यांना दोषही देत. ते ऐकून त्या नाल्यांना फार खेद वाटे.

एक नाला सर्वात छोटा आणि फार उथळही होता. पावसाळा संपताच तो सर्वात आधी आटत असे. त्यामुळे त्यालाच वाटसरूंची कटू बोलणी इतरांपेक्षा अधिक सहन करावी लागत असत. वाटसरू येता–जाता जलाशयाची तोंड भरून स्तुती करीत. तीही त्याला निमूटपणे ऐकावी लागे. त्यामुळे त्याच्या मनात वाटसरूंविषयीचा राग आणि जलाशयाविषयीचा द्वेष सतत खदखदत असे. पण मनातल्या मनात चरफडण्यावाचून दुसरा उपायच नसे.

एके वर्षी पाऊस फारसा पडलाच नाही. पावसाळ्यातही नद्या–नाल्यांना पूर आले नाहीत. प्रत्येक वर्षी पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारे मोठमोठे नाले त्या वर्षी ऐन पावसाळ्यात कसेतरी तग धरून वाहू लागले. मोठमोठ्या नाल्यांची ही स्थिती. मग सर्वात छोट्या आणि अगदीच उथळ

असलेल्या त्या नाल्याची दयनीय स्थिती काय वर्णावी? ऐन पावसाळ्यातच त्या बिचाऱ्याची जीवन धार अगदी क्षीण झाली. भविष्यकाळाची चिंता त्याला रात्रंदिन भेडसावू लागली. त्यातच वाटसरू येता–जाता त्याची थट्टा करून त्याच्या मनाला यातना देऊ लागले.

एकदा काही वाटसरू नाल्याजवळून जात होते. त्यातला एकजण त्या नाल्याच्या क्षीण प्रवाहाकडे पाहात हसून म्हणाला, ''आताच हा उघडा पडला. मग कडक उन्हाळ्यात काय करील हा नाला?''

त्यावर दुसरा वाटसरू तुच्छतेने त्या नाल्याकडे पाहात म्हणाला, ''हा कसला नाला? आपल्या गल्लीतल्या गटाराचा मोठा भाऊच हा ! त्याहून अधिक पात्रता नाहीच याची!''

दुसऱ्याच्या विधानावर तिसऱ्या वाटसरूने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली, ''अहो, ती पात्रता तरी आहे का याच्या अंगी? याच्यापेक्षा गल्लीतली गटारं कितीतरी बरी! निदान काही दिवस तरी त्यातलं पाणी टिकून राहतं, पण हा रात्री चूळभर पाण्यानं भरतो आणि सकाळी ठणठणीत कोरडा होतो.''

चौथा वाटसरू त्या नाल्याच्या जखमेवर मीठ चोळत म्हणाला, ''आपल्या या परिसरात कधीही न आटणारं तळं आहे म्हणून इथलं जीवन तग धरून आहे. एरव्ही असल्या असंख्य नाल्यांनी इथल्या परिसरावर मरणकळाच आणली असती!''

''होय भाऊ. तुमचं म्हणणं अगदी शंभर टक्के खरं आहे!''

चौथ्या वाटसरूचं ते बोलणं आणि इतरांनी त्याला दिलेला दुजोरा ऐकून तो नाला फारच अपमानित झाला. त्याला त्याची निंदा करणाऱ्या त्या वाटसरूंचा तर राग आलाच, पण वाटसरूंनी ज्याची फार स्तुती केली, त्या तळ्याचा फारच तिरस्कार वाटू लागला. तळ्याच्या मोठेपणाला भुलून लोक त्याची स्तुती करतात आणि त्याच्या तुलनेत आपली निंदा करतात अशा कल्पनेने तो त्या तळ्याचा द्वेष करू लागला. मनातल्या मनात सारखा कुढू लागला.

असं सारखं कुढत राहणं त्याला अगदीच असह्य होऊ लागलं, इतके दिवस त्याच्या मनात दबलेला राग आणि द्वेषाची भावना उफाळून वर आली. त्याच्या क्षीण आणि उथळ प्रवाहाचा खळखळाट वाढू लागला. तुडुंब भरलेले जलाशय अगदी शांत होते. स्वत:च्याच तंद्रीत समाधानाने ते डोलत होते.

त्यांचे ते समाधान पाहून नाला फारच खवळला आणि कुत्सितपणे जलाशयाला म्हणाला, ''लोक तोंड भरून तुझी स्तुती करतात ती ऐकतो आहेस ना?''

''हो, ऐकतो आहे!'' निर्विकारपणे जलाशयाने उत्तर देताच नाला चिडून म्हणाला,

''लोक माझी खूप निंदा करतात, तीही ऐकतो आहेस ना?''

''हो, तीही ऐकतो आहे.''

तटस्थ वृत्तीने जलाशयाने दिलेले उत्तर ऐकून अधिकच चिडलेल्या नाल्याने विचारले, ''या निंदा आणि स्तुतीबाबत तुला काहीच वाटत नाही?''